महाराष्ट्र राज्य सहकारी संघाचे वतीने प्रकाशित.

जा. क्र. : नाबँका/डी-४/गोदाम बांधकामे/मंजुरी/२००३
सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे, यांचे कार्यालय
दिनांक ४ फेब्रुवारी, २००३

# परिपत्रक

**विषय : नागरी सहकारी पतसंस्थांना गोदाम पावती योजनेअंतर्गत गोदामे बांधण्यास येणाऱ्या खर्चास कलम ७०ड नुसार परवानगीबाबत.**

केंद्र शासन पुरस्कृत योजनेअंतर्गत ग्रामीण गोदाम योजना सुरु करण्यात आलेली आहे व या योजनेअंतर्गत प्राप्त होणारे अनुदान हे सहकारी संस्थांनाच उपलब्ध होणार आहे. या संधीचा जास्तीत जास्त फायदा सहकारी संस्थांना व्हावा या उद्देशाने ज्या नागरी सहकारी पतसंस्था गोदाम पावती योजनेअंतर्गत बांधकाम करुन इच्छित आहेत अशा संस्थांना कलम ७०डी खाली गोदाम बांधकामास येणाऱ्या खर्चास मंजुरी घेण्याची अट सदर योजना सुरु झाल्याच्या दिनांकापासून ३ वर्षापर्यंतच्या कालावधीपर्यंत खालील अटीस अधिन राहून शिथील करण्यात येत आहेत.

अटी :
१) नागरी सहकारी पतसंस्थांना एम.आय.एस. विषयक वर्गवारी 'अ' व 'ब' वर्ग प्राप्त झालेल्या संस्था.
२) मागील ५ वर्ष लेखापरीक्षण वर्ग 'अ' प्राप्त झालेला असावा.
३) संस्थेने संशयीत व बुडीत कर्ज निधी उभारलेला असावा.
४) कर्ज वाटप स्वनिधीतून केलेले असावे.

सदर योजना गोदाम पावती योजनेअंतर्गतच उपयोगात आणण्यात यावी याशिवाय या योजनेचा अन्य कारणासाठी वापर केल्यास त्यास सर्वस्वी संचालक मंडळच जबाबदार राहील.

वरील बाबी आपल्या अधिन असलेल्या नागरी सहकारी पतसंस्थांच्या निदर्शनास आणून देण्यात याव्यात.

मा. आयुक्त यांचे मान्यतेने
सही/-
सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे करिता

जा. क्र. ना. बँका/डी-४/पतसंस्था/तपासणी/सूचना/०७
सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे १ यांचे कार्यालय,
दिनांक सप्टेंबर २००७

# परिपत्रक

**विषय : नागरी सहकारी पतसंस्थांसाठी TAFCOCS - {TASK FORCE FOR CO-OPERATIVE CREDIT SOCIETY} स्थापन करणेबाबत**

**संदभ : या कार्यालयाचे सम क्रमांकाचे परिपत्रक दि. १२ जुलै २००७**

नागरी सहकारी पतसंस्थांमधील काही घटनांमुळे सामान्य माणसांचा नागरी सहकारी पतसंस्थेवरील विश्वास कमी होत असल्यामुळे त्यांचे विपरीत परिणाम एकंदरच सहकार चळवळीवर होत असल्यामुळे नागरी सहकारी पतसंस्थांच्या गुणात्मक वाढीसाठी तसेच त्यांच्यामधील धोका कमी करण्यासाठी नागरी सहकारी पतसंस्थांवर असे योग्य नियंत्रण ठेवण्यासाठी संदर्भीय दि. १२-७-२००७ चे परिपत्रकान्वये TAFCOCS ची निर्मिती करण्यात आलेली होती. त्यामध्ये विभागस्तर व जिल्हास्तर TAFCOCS निर्माण करण्यात आलेले होते. सदर परिपत्रकामध्ये सुधारणा करणेबाबत.

**TAFCOCS चे उद्देश :**

१) नागरी सहकारी पतसंस्थांच्या नियंत्रणामध्ये सुसुत्रिकरण करणे

२) व्यवस्थापन प्रणालीमध्ये प्रशिक्षणाद्वारे बदल

३) अस्तित्वातील आर्थिकदृष्ट्या कमकुवत पतसंस्था, अडचणीतील पतसंस्था - परंतु त्यांच्यात सुधारणा होण्यास वाव असलेल्या पतसंस्थेचे एकत्रिकरण करणे.

४) नागरी सहकारी पतसंस्थांना आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यासाठी आवश्यक ते मार्गदर्शन करणे

५) नागरी सहकारी पतसंस्थांच्या कामकाजाबाबत आवश्यक ते धोरणात्मक निर्णय सुचविणे.

**TAFCOCS ची रचना :**

वरीलप्रमाणे निर्माण करावयाचे TAFCOCS हे राज्यस्तर, विभागस्तर व जिल्हास्तरावर असतील. सदरचे TAFCOCS हे MIS/ लेखापरीक्षण अहवालाप्रमाणे क व ड वर्गातील पतसंस्थांचा त्यांच्या कामकाजात सुधारणा करण्याचे दृष्टीने नियमित आढावा घेतील.

रु. २५ कोटीपेक्षा जास्त ठेवी असलेल्या पतसंस्थांचा आढावा हा राज्यस्तरावरील TAFCOCS रु. १ कोटीपेक्षा जास्त ते रु. २५ कोटीपेक्षा ठेवी असलेल्या पतसंस्थांचा आढावा हा विभागस्तरावरील TAFCOCS तर रु. १ कोटीपर्यंत ठेवी असलेल्या पतसंस्थांचा आढावा हा जिल्हास्तरावरील TAFCOCS घेईल.

सदर राज्यस्तर, विभागस्तर व जिल्हास्तरावरील TAFCOCS चे सदस्य खालीलप्रमाणे राहतील.

**अ) राज्यस्तर TAFCOCS**

| | | |
|---|---|---|
| १) | सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था | अध्यक्ष |
| २) | महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन एक प्रतिनिधी | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ३) | राज्यस्तर पॅनेलवरील एक CA | सदस्य |
| ४) | राज्यस्तरावरील सक्षम व नामांकित पतसंस्थेचा १ प्रतिनिधी | सदस्य |
| ५) | राज्यातील सहकार क्षेत्रातील तज्ञ व नामांकित व्यक्ती | सदस्य |
| ६) | अपर निबंधक (त व नि) सहकारी संस्था | सदस्य सचिव |

ब) विभागस्तर TAFCOCS

| | | |
|---|---|---|
| १) | विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था | अध्यक्ष |
| २) | विभागीय सहनिबंधक (लेखापरिक्षण) | सदस्य |
| ३) | जिल्हा उपनिबंधक (सर्व) | सदस्य |
| ४) | म. रा. सहकारी पतसंस्था फेडरेशनचा १ प्रतिनिधी | सदस्य |
| ५) | विसनि पॅनेलवरील एक CA | सदस्य |
| ६) | विभागस्तरावरील सक्षम व नामांकित पतसंस्थेचा १ प्रतिनिधी | सदस्य |
| ७) | सहकार क्षेत्रातील तज्ञ व नामांकीत व्यक्ती | सदस्य |
| ८) | विभागीय उप/सहायक निबंधक | सदस्य/सचिव |

क) जिल्हास्तर TAFCOCS

| | | |
|---|---|---|
| १) | जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था | अध्यक्ष |
| २) | जिल्हा विशेष लेखापरीक्षक | सदस्य |
| ३) | जिल्हा सहकारी पतसंस्था फेडरेशनचा १ प्रतिनिधी | सदस्य |
| ४) | विसनि पॅनेलवरील एक CA | सदस्य |
| ५) | जिल्हास्तरावरील सक्षम व नामांकित पतसंस्थेचा १ प्रतिनिधी | सदस्य |
| ६) | सहकार क्षेत्रातील तज्ञ व नामांकित व्यक्ती | सदस्य |
| ७) | सहाय्यक निबंधक | सदस्य सचिव |

वरीलप्रमाणे TAFCOCS निर्माण करताना राज्यस्तरावरील, विभागस्तरावरील व जिल्हास्तरावरील TAFCOCS मध्ये त्या त्या विभागातील/जिल्ह्यातील चांगले Goodwill असलेल्या/नामांकित पतसंस्थेच्या पदाधिकारी यांना त्यांचे Goodwill विचारात घेऊन १ अशासकीय सदस्य म्हणून तर आपले जिल्ह्यातील/विभागातील सहकार क्षेत्रातील तज्ञ व्यक्तींची १ अशासकीय सदस्य म्हणून अशाप्रकारे २ अशासकीय सदस्य TAFCOCS मध्ये नियुक्त करता येतील. असे अशासकीय दोन सदस्य घेण्याची सदर TAFCOCS च्या अध्यक्षांना पूर्ण मुभा राहील.

**TAFCOCS च्या कामाचे स्वरुप :**

१) TAFCOCS त्या त्या विभागातील दुर्बल परंतु सक्षम असलेल्या पतसंस्थांनी परिस्थिती सुधारण्यासाठी निश्चित कालावधी कार्यक्रम आखून देईल. त्यासाठी मार्गदर्शन व आवश्यकतेनुसार व्यवस्थापनात बदल सुचवेल.

२) या कालावधीत संबंधित पतसंस्थेने सुधारणा केली नसल्यास तिचे दुसऱ्या मोठ्या पतसंस्थेत विलीनीकरणाचा प्रयत्न करेल किंवा सदर पतसंस्थेवर उचित कार्यवाही सुचवेल किंवा अवसायानात काढण्याबाबत निर्णय घेईल.

३) सदर TAFCOCS ची सभा दरमहा नियमितपणे भरेल.

४) MIS/लेखापरीक्षण अहवालानुसार राज्यस्तरीय सह सर्वच क व ड वर्गातील एक कोटीपेक्षा कमी ठेवी असलेल्या पतसंस्थांबाबतचा आढावा जिल्हास्तरावरील TAFCOCS घेईल तर रु. १ कोटीपेक्षा जास्त ते रु. २५ कोटीपर्यंत ठेवी असलेल्या पतसंस्थांबाबतचा आढावा हा विभाग स्तरावरील TAFCOCS घेईल आणि रु. २५ कोटीपेक्षा जास्त ठेवी असलेल्या पतसंस्थांचा आढावा हा राज्यस्तरावरील TAFCOCS घेईल.

५) सदर TAFCOCS च्या सभेस अशा संबंधित संस्थेच्या संचालक मंडळाची उपस्थिती अनिवार्य राहील. त्याप्रमाणे सभेपूर्वी अशा संस्थेच्या संचालक मंडळास सदर सभेस उपस्थित राहण्याच्या सूचना देण्याची जबाबदारी सदस्य सचिव यांची राहील.

६) TAFCOCS सदर पतसंस्थांना निश्चित कालावधीसाठी लक्षांक देऊन कार्यक्रम आखून देईल व त्याचा नियमितपणे आढावा घेईल (कालबद्ध कार्यक्रम)

७) विहीत कालावधीमध्ये व वेळोवेळी आढावा घेऊन सदर पतसंस्थेच्या आर्थिक स्थितीमध्ये कोणतीही सुधारणा होत नाही असे निदर्शनास आल्यास सदर पतसंस्था दुसऱ्या सहकारी पतसंस्थेमध्ये विलिनीकरण करणे किंवा अवसायनात घेणे याबाबत TAFCOCS निर्णय घेईल व त्याप्रमाणे संबंधित निबंधकास कळविल. संबंधित निबंधकांनी त्याप्रमाणे तात्काळ कार्यवाही करणे आवश्यक राहील.

८) ज्या नागरी सहकारी पतसंस्थेचे चुकीचे लेखापरीक्षण करून अ वर्ग दिलेला आहे अशा संस्थांचे लेखापरीक्षण केलेल्या लेखापरीक्षकांवर पुढील कारवाई करण्याबाबत संबंधित निबंधकास TAFCOCS कळविल.

वरीलप्रमाणे केलेल्या कार्यवाहीचा अहवाल नियमितपणे या कार्यालयास सादर करण्यात यावा.

सहकार आयुक्त व निबंधक
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रति,

१) विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था (सर्व)
२) विभागीय सहनिबंधक (लेखापरिक्षण) सहकारी संस्था (सर्व)
३) जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था (सर्व)
४) जिल्हा विशेष लेखापरीक्षक सहकारी संस्था (सर्व)
५) तालुका उप/सहाय्यक निबंधक सहकारी संस्था (सर्व)
६) महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन लि., कोल्हापूर
७) पुणे जिल्हा नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशन लि., पुणे
८) महाराष्ट्र स्टेट को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., पुणे

जा. क्र. ना. बँका/डी-४/कर्जदार/माहिती/२००७
सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचे कार्यालय,
दिनांक २० सप्टेंबर २००७

# परिपत्रक

## विषय : कर्जदार व जामिनदार यांना त्यांचे कर्जखात्यांशी संबंधीत माहिती/ कागदपत्रे उपलब्ध करून देणेबाबत...

नागरी सहकारी पतसंस्था या मूळ कर्ज मागणी अर्ज कर्ज मंजुरी कागदपत्र या कर्जदारास देत नसल्याबाबत विविध तक्रार अर्ज या कार्यालयास प्राप्त होत असतात.

सदरबाबत सूचित करण्यात येते की, कर्जदाराने घेतलेल्या कर्जाच्या कायद्याविषयीची माहिती (मूळ कर्ज मागणी अर्ज, कर्ज मंजुरी पत्र, करारपत्रे, वचनचिठ्ठी स्टेटमेंट ऑफ अकौंटस् कर्ज प्रकरणासोबतची इतर अनुषंगीक कागदपत्रे) त्याने मागणी केल्यास ती प्राधान्याने संबंधीत संस्थांनी देणे बंधनकारक असून अशी माहिती कर्जदारास नैसर्गिक न्याय तत्वाचे अनुषंगाने देणे आवश्यक आहे.

याबाबत सर्व नागरी सहकारी पतसंस्थांना कळविण्यात येते की, कर्जदाराने वा जामिनदाराने त्यांचे कर्ज प्रकरणी मागणी केलेली अनुषंगिक माहिती कर्जदाराला किंवा जामिनदाराला देणे बंधनकारक आहे. त्यामुळे कर्जदारांनी/ जामिनदारांनी अशी मागणी केलेली माहिती संबंधीतांना प्राधान्याने देण्याबाबत कार्यवाही करावी.

अप्पर निबंधक, सहकारी संस्था
(तपासणी व निवडणुका) महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रति :

१) विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था (सर्व)

२) जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था (सर्व)
त्यांना कळविण्यात येते की, वरीलप्रमाणे माहिती संस्था देत नसल्यास सदर माहिती कर्जदारास/जामिनदारास उपलब्ध करून देण्याचे अनुषंगाने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कायद्यातील तरतुदीप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

३) अध्यक्ष/कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन मर्या., मुंबई

४) सहाय्यक निबंधक सहकारी संस्था (परसेवा) पूर्ण जिल्हा नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशन

जा.क्र. : ना.बँका/डी-४/सह.पतसंस्था/अधिकार/२००८
सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचे कार्यालय,
दिनांक २६ ऑगस्ट २००८

# प्रस्तावना

ज्याअर्थी, राज्यामध्ये नागरी सहकारी पतसंस्थांचे कार्यक्षेत्र हे गांव/वॉर्ड, तालुका, जिल्हा, विभाग व राज्य याप्रमाणे सर्वसाधारणपणे आहे. राज्यस्तरावरील पतसंस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील तरतुदीनुसार नोंदणीकृत झालेल्या असून या कार्यालयाच्या अधिकार कक्षेतील आहेत, आणि

ज्याअर्थी, दोन विभाग कार्यक्षेत्र असलेल्या सर्व नागरी पतसंस्था या राज्यस्तराच्या अधिकार कक्षेत येतात. संस्थाचे कार्यक्षेत्र दोन विभाग कार्यक्षेत्र वाढ झाली की पतसंस्था राज्यस्तरीय होत असल्यामुळे मुंबई, कोकण, पुणे, कोल्हापूर, औरंगाबाद, लातूर अशा नवीन निर्माण झालेल्या विभागामुळे राज्यस्तरीय पतसंस्थांची संख्या प्रचंड वाढलेली आहे, आणि

ज्याअर्थी, दोन विभागापेक्षा जास्त कार्यक्षेत्र, असलेल्या नागरी पतसंस्था यांचे कार्यक्षेत्र राज्यस्तरीय असल्यामुळे संबंधित विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, जिल्हा उपनिबंधक यांचेकडून संस्थेच्या कामकाजाच्या दृष्टीने कोणतेही नियंत्रण/हस्तक्षेप केला जात नाही, आणि

ज्याअर्थी, राज्यस्तरावरील नागरी सहकारी पतसंस्थाचे कामकाज पाहण्यासाठी राज्यस्तरावर पतसंस्था कक्ष असून सदर संस्थांचे वैधानिक कामकाज उक्त कार्यासनामार्फत चालते कार्यासनाकडे सदरचे कामकाज पहाण्यासाठी अल्प कर्मचारी वर्ग कार्यरत आहे. (३ वरिष्ठ लिपीक व एक उपनिबंधक दर्जाचा अधिकारी असा स्टाफ आहे), आणि

ज्याअर्थी, पतसंस्थांबाबत पतसंस्था कार्यासनांकडून शासनाकडील पत्रव्यवहार, राज्यातून पतसंस्थांकडून ठेवी परत न मिळणे व संचालक मंडळाचे कामकाज इ. बाबींच्या अनुषंगाने प्राप्त झालेल्या तक्रारी, संचालक मंडळ कलम ७७, ७८, अंतर्गत बरखास्त करणे, कलम १५२ कलम १५४ अंतर्गत दाखल केलेल्या अपीलावर म्हणणे सादर करणे व वेगवेगळ्या न्यायालयात दाखल याचिकांबाबत परिच्छेद निहाय अभिप्राय/शपथपत्र दाखल करणे, माहितीचा अधिकार अंतर्गत माहिती देणे. संस्थांकडून मोठ्या प्रमाणात प्राप्त होणाऱ्या पोटनियम दुरुस्ती प्रस्तावावर निर्णय घेणे, १५६ अन्वये वसुलीचे अधिकार देणेबाबतचे प्रस्ताव, इमारत निधी गुंतवणुकीबाबतचे प्रस्ताव, वाहन खरेदी विक्री प्रस्ताव मालमत्ता खरेदी-विक्री प्रस्ताव, अपसेट प्राईस मंजुरी प्रस्ताव, कलम १०० नियम ८५ अंतर्गत प्राप्त होणारे प्रस्ताव, वार्षिक सर्वसाधारण सभा मुदतवाढ वगैरे प्रमाणे प्रस्ताव या कार्यालयाकडे प्राप्त होतात. सदरील कामाच्या व्यापामुळे कार्यासन हे संपूर्ण वेळ व्यस्त असते. वास्तविक या कार्यासनाचे प्रमुख काम म्हणजे नागरी पतसंस्थांबाबत धोरणात्मक निर्णय घेणे व ते राबविणे तथापि या कार्यासनाकडे असलेले मनुष्यबळ विचारात घेता राज्यस्तरावरील सर्व संस्थांवर राज्यस्तरावरुन सतत नियंत्रण ठेवणे शक्य होत नाही. तसेच संस्थेचे कार्यक्षेत्र राज्य असल्यामुळे विभागीय सहनिबंधक व जिल्हा उपनिबंधक हेही सदर संस्थेच्या कामकाजात हस्तक्षेप करीत नाहीत व त्यामुळेच बऱ्याचशा पतसंस्थांचा कल कार्यक्षेत्र वाढ करण्याचा असल्याचे दिसून आले आहे. नागरी सहकारी पतसंस्था अडचणीत येण्यांची अनेक करणे असली तरी अपुरे नियंत्रण हे त्यापैकी एक प्रमुख कारण आहे, आणि

ज्याअर्थी, मा. प्रधान सचिव, (सहकार व पणन) यांनी राज्यस्तरीय पतसंस्थावर सुयोग्य नियंत्रण ठेवण्यासाठी राज्यस्तरीय पतसंस्थांचे वैधानिक अधिकार हे राज्यस्तरीय संस्थांचे मुख्यालय ज्या जिल्ह्यामध्ये आहे त्या जिल्हा उपनिबंधक यांना प्रदान करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत, आणि

ज्याअर्थी, राज्यस्तरावरील संस्थांवर निबधंकाचे प्रभावी नियंत्रण राहण्याच्या दृष्टीने सदर संस्थाचे कार्यक्षेत्र दोन विभागापेक्षा जास्त/राज्यस्तरावरील असले तरी अशा संस्थाचे मुख्यालय ज्या जिल्ह्यामध्ये आहे त्या जिल्ह्याच्या जिल्हा उपनिबंधकांना अशा संस्थांबाबतच अधिकार देणे अत्यंत आवश्यक आहे अशी माझी खात्री झालेली आहे.

त्याअर्थी, मी खालील आदेश पारित करीत आहे.

## आदेश

मी कृष्णा लव्हेकर, सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील तरतुदीअन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार राज्यातील सर्व दोन विभागापेक्षा जास्त कार्यक्षेत्र असलेल्या राज्यस्तरीय पतसंस्थाबाबतचे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ अन्वये कलम ७७ अ, कलम-७८, कलम ८३ व कलम ८८ अन्वये प्राप्त अधिकार वगळता सर्व अधिकार हे अशा संस्थांचे मुख्यालय ज्या जिल्ह्यामध्ये आहे त्या जिल्ह्याच्या जिल्हा उपनिबंधक यांना प्रदान करीत आहे.

या आदेशाचे दिनांकानंतर संबंधीत जिल्हा उपनिबंधक यांनी सहकार आयुक्त कार्यालयाने किंवा अशा राज्यस्तरीय पतसंस्थांच्या ठेवीदार/तक्रारदाराने मागणी केलेली सर्व माहिती उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी ही संबंधीत जिल्हा उपनिबंधक यांची राहील. संबंधीत जिल्हा उपनिबंधक यांनीच अशा सर्व राज्यस्तरीय संस्थावर वर नमुद वैधानिक कार्यवाही करुन, अशा संस्थांमधील कर्ज वसुली करुन, ठेवीदारांच्या ठेवी परत करावयाच्या आहेत.

सदरचे आदेश हे आज दि. २६-८-२००८ रोजी माझे सही शिक्यानिशी निर्गमित करण्यात येत आहेत.

(डॉ. कृष्णा लव्हेकर)
सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रति,

१) विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था (सर्व)
२) जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था (सर्व)
३) तालुका उप/सहायक निबंधक सहकारी संस्था (सर्व)

क्रमांक : सीसीआर-११०९/प्र. क्र. ५६५/७-स
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,
मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२
दिनांक - २३ जुलै २००९

विषय : महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७९ (क)(१) अन्वये नागरी/ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थांच्या आर्थिक बाबींच्या नियमनाबाबत निर्देश

वाचा : सहकार आयुक्त व निबंधक सह. संस्था महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. बँका/डी-४/पतसंस्था/नियमक मंडळ/०९ दिनांक १४ जुलै २००९

प्रस्तावना :

ज्याअर्थी महाराष्ट्र राज्यामध्ये १७,००० पेक्षा जास्त नागरी/ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था कार्यरत आहेत आणि महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ मधील तरतुदी या नोंदणी, सदस्य, त्यांचे हक्क आणि दायित्व, संस्थांची कर्ज उभारणी, कर्ज वाटप आणि व्याज आकारणी, संस्थांची मालमत्ता आणि निधी, संस्थांचे व्यवस्थापन, लेखापरीक्षण, चौकशी, निरिक्षण आणि पर्यवेक्षण तसेच परिसमापन यांच्याशी संबंधीत आहेत आणि,

ज्याअर्थी मागील काही वर्षात सहकारी पतसंस्थांच्या कामकाजाची व्याप्ती वाढलेली आहे. तसेच महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम/नियम/संस्था पोटनियम यांच्या तरतुदीनुसार पतसंस्थांचे नियंत्रण करण्यामध्ये निबंधकाला अडचणी येत आहेत आणि,

ज्याअर्थी सहकारी पतसंस्थांप्रमाणेच कामकाज करणाऱ्या नागरी सहकारी बँकांचे नियंत्रण करण्यासाठी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियासाठी बँकिंग नियमन कायदा १९४९ निर्माण केलेला आहे. त्याचप्रमाणे कामकाज करणाऱ्या नागरी/ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थांची वाढ विचारात घेऊन त्यांच्यासाठी वैधानिकदृष्ट्या नियमन करण्याच्या कायदेशीर तरतुदी असणे आवश्यक आहे आणि

ज्याअर्थी वैधानिकदृष्ट्या नियमन करण्यासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मध्ये प्रकरण समाविष्ट करणे आवश्यक आहे. सदर प्रकरण समाविष्ट करण्यासाठी नियंत्रणात्मक कायदा तयार करण्यासाठी काही कालावधी लागण्याची शक्यता आहे.

त्याअर्थी दरम्यानच्या कालावधीत सहकार आयुक्त व निबंधक यांच्या अध्यक्षतेखाली नागरी/ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थांसाठी नियामक मंडळ स्थापन करणे आणि त्याचे उद्देश, रचना व कार्यकक्षा ठरविणे आवश्यक आहे आणि

ज्याअर्थी महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७९ (क) (१) अन्वये शासनास प्राप्त असलेल्या शक्तीचा वापर करून निर्देश देणे आवश्यक आहे अशी शासनाची खात्री झाली आहे.

त्याअर्थी शासन खालीलप्रमाणे निर्देश देत आहे.

निर्देश : महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७९ (क) (१) अन्वये शासनास प्राप्त झालेल्या अधिकारानुसार राज्यातील नागरी/ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थांच्या आर्थिक बाबींच्या नियमनाबाबत पुढीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.

राज्यातील नागरी/ग्रामीण बिगरशेती पतसंस्थांच्या आर्थिक बाबींचे नियमन करण्यासाठी सहकारी आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे यांचे अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय नागरी/ग्रामीण बिगरशेती पतसंस्था नियामक मंडळ स्थापन करण्यात यावे. सदर नियामक मंडळाची रचना खालीलप्रमाणे राहील.

| | | |
|---|---|---|
| १) | सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था म. रा. पुणे | अध्यक्ष |
| २) | अप्पर आयुक्त व विशेष निबंधक सहकारी संस्था म. रा. पुणे | सदस्य |
| ३) | अप्पर निबंधक सहकारी संस्था म. रा. पुणे | सदस्य |
| ४) | महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन प्रतिनिधी | सदस्य |
| ५) | बँकिंग क्षेत्रातील तज्ञ (दोन) | सदस्य |
| ६) | सहकार क्षेत्रातील कामकाजाचा अनुभव असलेला सनदी लेखापाल | सदस्य |
| ७) | उपनिबंधक सहकारी संस्था (नागरी पतसंस्था) | सदस्य सचिव |

सदर नियामक मंडळाची सभा दरमहा घेण्यात यावी.

राज्यस्तरीय नागरी/ग्रामीण बिगरशेती पतसंस्था नियामक मंडळाची कार्यकक्षा खालीलप्रमाणे राहील.

१) नागरी/ग्रामीण बिगरशेती पतसंस्थांचे नोंदणी व शाखा विस्ताराबाबत निकष निश्चित करणे.

२) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील तरतुदीनुसार निधी उभारणेबाबत निकष निश्चत करणे.

३) ठेवीदारांच्या ठेवींच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक त्या उपाययोजना सुचविणे.

४) पतसंस्थांच्या निधींची गुंतवणूक करणेबाबतचे धोरण निश्चित करणे.

५) पतसंस्थांच्या कर्ज वितरणाबाबतचे धोरण निश्चित करणे.

६) पतसंस्थेच्या आर्थिक हिताचे दृष्टीने कायद्यामध्ये बदल सुचविणे व दंडात्मक तरतुदी सुचविणे.

७) पतसंस्थांच्या आर्थिक स्थितीचा आढावा घेणे व त्यावर उपाययोजना करणे संदर्भात कायमस्वरुपी यंत्रणा निर्माण करणे.

८) पतसंस्थेचे आर्थिक व्यवहार तसेच ताळेबंद यांची छाननी करणे, पतसंस्थांचे मूल्यमापन करून त्यानुषंगाने संबंधीत पतसंस्थेवर उपाययोजनात्मक कार्यवाही/दंडात्मक कारवाई/कायदेशीर कारवाई करणेबाबत निबंधकास सुचविणे.

९) राज्यातील सर्व राज्यस्तरीय, विभागस्तरीय व जिल्हास्तरीय पतसंस्थांचा तसेच विभागीय व जिल्हा नियामक मंडळाकडून प्राप्त झालेल्या अडचणीतील पतसंस्थांची परिस्थिती सुधारण्यासाठी कालबद्ध कार्यक्रम तयार करणे व त्या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीवर देखरेख व नियंत्रण ठेवणे.

१०) सुधारणा होत नसलेल्या पतसंस्थांच्या बाबतीत कायद्यातील तरतुदीनुसार उचित कार्यवाही सुचविणे.

११) लेखापरिक्षण वर्गवारीनुसार क व ड वर्गातील पतसंस्थांची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी कायमस्वरुपी कालबद्ध कार्यक्रम राबविणे.

१२) चुकीचे लेखापरिक्षण करणाऱ्या लेखापरिक्षकांवर पुढील कारवाई करण्याबाबत संबंधीत निबंधकास सुचविणे.

१३) आवश्यकतेनुसार विभागस्तरीय व जिल्हास्तरीय नागरी/ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था नियामक मंडळे स्थापन करणे व कामकाजाबाबत त्यांना मार्गदर्शन करणे.

१४) स्पर्धात्मक युगात पतसंस्थांचे आव्हान टिकून राहण्यासाठी अत्याधुनिक ज्ञान व तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यासाठी अभ्यासगट स्थापन करणे व आवश्यकतेनुसार पतसंस्थेच्या कामकाजाच्या अनुषंगाने सहकार कायदा व इतर अनुषंगिक कायद्यात बदल सुचविणे. याबाबतची कार्यवाही सदरचे निर्देश जारी झाल्यापासून एक महिन्याच्या आत पूर्ण करणेची जबाबदारी राज्य नियामक मंडळावर राहील.

वरीलप्रमाणे स्थापन करण्यात आलेल्या राज्य नियामक मंडळाने त्यांना ठरवून दिलेल्या कार्यकक्षेच्या अनुषंगाने वेळोवेळी घेतलेले निर्णय/सुचना संबंधीत पतसंस्था, त्यांचे पदाधिकारी, अधिकारी व सभासद/ठेवीदार यांना कायद्याच्या तरतूदीच्या अधीन राहून त्या त्या निबंधकावर बंधनकारक राहतील.

बँकींग क्षेत्रातील तज्ञ व सहकारी क्षेत्रातील कामकाजाचा अनुभव असलेला सनदी लेखापाल यांच्या नियुक्तीबाबतची कार्यवाही सहकार आयुक्त व निबंधक, पुणे यांनी त्यांच्या स्तरावर करावी व वरील बाबतच्या कार्यवाहीचा अहवाल शासनास वेळोवेळी पाठवावा. तसेच वरील निर्देशांचे अनुपालन करण्याची जबाबदारी सहकार आयुक्त व निबंधक, पुणे यांची राहल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने.

(सुधीर कुमार गोयल)
प्रधान सचिव (सहकार व पणन)
महाराष्ट्र शासन

प्रति,

१) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे
२) अप्पर आयुक्त व विशेष निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे
३) अप्पर निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे
४) महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन मर्या., मुंबई सुरक्षा भवन, गुलटेकडी, पुणे ३७
५) विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)
६) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)
७) निवडनस्ती.